महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


## जाहिरात क्रमांक ११/२०२० - विमा सहायक संचालक, सामान्य राज्य सेवा, गट-अ

## शुध्दीपत्रक

**क्रमांक डीआरए-०५२१/सी.आर.१९/२०२१/जाहिरात** **जाहिरात क्रमांक ११/२०२०**

विमा सहायक संचालक, सामान्य राज्य सेवा, गट-अ संवर्गातील एका पदावरील भरतीकरीता जाहिरात दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीमधील (जाहिरात क्रमांक ११/२०२०) परिच्छेद क्रमांक ४.३ खालील **AND THEREAFTER** ही शब्दरचना वगळण्यात येत असून अनुभव कालावधी कला, विज्ञान, वाणिज्य किंवा विधि या पदवीनंतरचा ग्राह्य समजण्यात येत आहे. त्यामुळे सदर जाहिरातीकरीता खाली नमूद अर्हतेनुसार अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी पुन्हा उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

**(एक) शैक्षणिक अर्हता:- The candidate must -**

**(i) Possess a degree in Arts, Science, Commerce or Law.**

**(ii) Have passed Associate ship examination of the Federation of Insurance Institutes.**

**(दोन) अनुभव:-Possess experience of not less than two years is handling Insurance matters, gained after acquiring the qualifications mentioned in sub-clause (i)**

**प्राध्यान्यशिल अर्हता:- Provided that, preference may be given to candidates who are associate of the Institute of Actuaries, London or who possess equivalent qualification of an Actuarial Institute of any other country.**

**२. दिव्यांग आरक्षण :-**

**२.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**२.२** शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: आस्थाप-२०२१/प्र .क्र.६/विमा प्रशासन, दिनांक १८ जून, २०२१ अन्वये खालील दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती / उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत :-

(1) Deaf, Hard Hearing, (2) One Arm, Both Arm, One Leg, Both leg, One Arm and One leg, Leprosy Cured, Dwarfism, Acid Attack Victim, (3) Multiple Disabilities involving (1) to (2)

**२.३** जाहिरात क्रमांक ११/२०२० ला अनुसरुन यापूर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांची पात्रता शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक- अपंग/२०११/प्र.क्र.१७७/सुधार-३, दिनांक १५ ऑक्टोबर, २०११ नुसार निश्चित करण्यात येईल.

**३. दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजी प्रसिध्द झालेल्या प्रस्तुत पदाच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज केलेल्या उमेदवारांना पुन्हा नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. परंतु आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Upload Documents या सदरामध्ये निम्न नमूद विहित प्रमाणपत्रे/कागदपत्रे ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहतील. तसेच नव्याने अर्ज करणा-या उमेदवारांनी, प्रचलित पध्दतीनुसार निम्न नमूद विहित प्रमाणपत्रे/कागदपत्रे ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहतील.**

**३.१** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवाराची पात्रता अजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना पुढीलप्रमाणे कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागूअसलेली) अपलोड करावी लागतील:-

| अ. क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ६ | अद्यावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र (लागू असल्यास) (वित्तीय वर्ष २०२०-२१) | PDF | ५० | ५०० |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ९ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याबाबतचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| ११ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १२ | एस.एस.सी मधील नावात बदल झाल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा (लागू असल्यास) | PDF | ५० | ५०० |
| १४ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | अनुभवाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १६ | राज्य शासकीय कर्मचारी यांच्याकरीता वयोमर्यादेतील सवलतीचा दावा असल्यास सादर करावयाचे प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |

**३.२** उपरोक्त कागदपत्रे/प्रमाणपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**३.३** अद्ययावत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र / अर्थिकदष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरीत केलेले व प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्हता सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे वित्तीय वर्ष (२०२०-२१) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**३.४** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**३.५** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय नव्याने अर्ज सादर करता येणार नाही.

**४. पात्रता:-**

**४.१ उपरोक्त शैक्षणिक अर्हता आणि अनुभव तसेच दिव्यांग पात्रतेसंदर्भातील तरतुदी वगळता अन्य सर्व अटी व तरतुदी मूळ जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणेच कायम राहतील.**

**४.२ वयोमर्यादा मूळ जाहिरातीनुसार दिनांक १ डिसेंबर, २०२० रोजी गणण्यात येईल.**

**४.३ शैक्षणिक अर्हता आणि अनुभव दिनांक २५ ऑगस्ट, २०२० पर्यन्तच ग्राह्य समजण्यात येईल.**

**५. अर्ज सादर करण्याचा कालावधी:-**

**दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजी १४.०० वाजल्यापासून दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**६. शुल्क (रुपये) :-**

**६.१ शुध्दीपत्रकानुसार नव्याने अर्ज सादर करणा-या उमेदवारांना खालीलप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक राहील:-**

**(एक)** अराखीव (खुला) - **रुपये ७१९/-**

**(दोन)** मागासवर्गीय / आर्थिक दुर्बल घटक / अनाथ - **रुपये ४४९/-**

**(तीन)** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**(चार)** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

**७. ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यन्त.**

**८. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत.**

**९.** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

**१०.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीप्रक्रियेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

**११. सविस्तर मूळ जाहिरात क्रमांक ११/२०२०, आयोगाच्या https://,mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावरील 'CANDIDATE INFORMATION' मधील 'Advertisements/Notifications या सदरात उपलब्ध आहे.**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: ६ डिसेंबर, २०२१**

**सह सचिव, (जाहिरात)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**